● गुरुवार, दि ५ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जेष्ठहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### शिवसेना नेते आदित्य ठाकरे बांधावर; शेतकऱ्यांशी साधला संवाद

## सरकारने तात्काळ विमा कंपनींना आदेश देऊन शेतकऱ्यांना मदत द्यावी - आदित्य ठाकरे

**जालना । प्रतिनिधी -** आमचा दौरा ठरल्यानंतर सरकारनं पंचनाम्याचे आदेश दिले असल्याचा आरोप शिवसेना उबाठाचे नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर केलाय. बुधवार (दि. ४) रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास आदित्य ठाकरे यांनी जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यातील अंबडगाव येथे नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत अंबादास दानवे आणि संजय राऊत हे ही शेतकर्याच्या बांधावर दाखल झाले. यावेळी आदित्य ठाकरे यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला असता. ई पिक पाहणी करिता शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय. ॲपवर फोटो अपलोड होत नाही. त्याला शेतात नेटवर्क मिळत नाही. त्यामुळं ई पिक पाहणीसाठी ट्युशन लावावे लागेल. असंही आदित्य ठाकरे यांनी म्हंटले आहे. त्याचबरोबर शेतकरी हा हतबल झाला असून सरकार माय बाप असतं त्यांनी विचारपूस करायला यायला हवं होतं. त्यांचे मंत्री कुठे आहेत तर दिसत नाहीत. त्यामुळे सरकारने तात्काळ विमा कंपनींना आदेश देवून शेतकऱ्यांना मदत द्यावी असं आदित्य ठाकरे यांनी म्हंटले आहे.

मराठवाडयात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे हे मराठवाडा दौऱ्यावर आहे. पाचोड येथील अतिवृष्टीची पाहणी करून बदनापूर तालुक्यातील अंबडगाव शिवारातील श्रीरंग जऱ्हाड यांच्या कपाशी पिकाची अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीची पाहणी करत असताना शेतकऱ्यांनी त्यांच्या व्यथा आदित्य ठाकरे यांच्यासमोर मांडल्या. पिक विम्याच्या नुसत्या घोषणा होतात मात्र, प्रत्यक्ष शेतकऱ्यांना पिक विमा मिळत नाहीत. सध्याचे सरकार फक्त घोषणाबाजी करते. प्रत्यक्ष मदत मात्र, होताना दिसत नाही. ऑनलाईन हा फॉर्म भरा.. तो फॉर्म भरा, ऑनलाईन पिक पेरा टाका यातच शेतकऱ्यांना नाहक गुंतवून ठेवण्याचे काम हे सरकार करते. ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतरही महिनोंमहिने मदत मिळत नसल्याची खंतच येथील शेतकऱ्यांनी बोलून दाखवली. सर्व शेतकऱ्यांचे ऐकून घेतल्यावर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी उध्दवसाहेबांचे सरकार असताना कोणतेही ऑनलाईन प्रक्रिया न राबवता सर्वांना दोन लक्ष रुपयांपर्यंत कर्ज माफी दिल्याचे उदाहरण देत आपले सरकार हे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे सरकार होते. कोणतेही नुकसान झाल्यास ऑनलाईन, पंचनामे करण्यापूर्वी शेतकऱ्यांना कशी तात्काळ मदत जाईल याबाबत उध्दवसाहेब स्वतः लक्ष देत असल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या तीव्र भावना व व्यथा कळली असून त्याबाबत सरकारकडे दाद मागितली जाईल असे सांगितले. तसेच येणाऱ्या काळात महाविकास आघाडीचे म्हणजेच शेतकऱ्यांचेच सरकार सत्तेत येणार असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऑनलाईनपेक्षा प्रत्यक्ष व तात्काळ मदत शेतकऱ्यांना कशी मिळेल या बाबत नियोजन करण्यात येईल असे सांगितले. यावेळी मोठया संख्येने असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा आदित्य ठाकरे यांच्यासमोर मांडून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत महायुती शासन उदासिन असल्याचे सांगितले. सध्याच्या



सरकारचे मराठवाडयातील शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष असून शासनाने शेतकरी वाऱ्यावर सोडला असल्याची तीव्र प्रतिक्रिया या वेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी आदित्य ठाकरे सोबत शिवसेना नेते संजय राऊत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, संजय लाखे, माजी आमदार संतोष सांबरे, बबलू चौधरी इत्यादी सह कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एसटी कर्मचाऱ्यांचा संप मागे

### पगारात साढेसहा हजारांची वाढ; सरकारचा निर्णय

**मुंबई -** आपल्या विविध मागण्यांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे राज्यभरातील एसटी सेवा विस्कळीत झाली होती. दरम्यान, यासंदर्भात बुधवार (दि ४) मुख्यमंत्री आणि एसटी कामगार संघटना यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर आता एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेत असल्याचे जाहीर केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृहावर झालेल्या बैठकीत राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या असून कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारात साडे सहा हजार रुपयांची वाढ करण्याचे मान्य केलं आहे. तसेच ज्यांना कर्मचाऱ्यांना गुन्हे दाखल झाल्याने बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांना पुन्हा कामावर घेण्याचंही सरकारने मान्य केलं आहे. सरकारच्या या निर्णयानंतर एसटी कर्मचारी संघटनांनी समाधान व्यक्त केलं आहे. दरम्यान, राज्यात दोन दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू होता. ऐन गणेशोत्सवाच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या प्रवाशांचे हाल होते होते. यासंदर्भात मंत्री उदय सामंत यांनी एसटी कर्मचारी कृती समितीबरोबर बैठकही घेतली होती. मात्र, या बैठकीत तोडगा निघू शकला नव्हता. त्यानंतर आज मुख्यमंत्र्यांबरोबर एसटी कर्मचारी कृती समिती आणि विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांची बैठकी पार पडली. या बैठकीत तोडगा निघाल्याने संप मागे घेण्यात आला आहे.

युवा आदर्श

### शिक्षकी पेशा...

गिरवितो श्री गणेशा
शिक्षक बनुनि माता
वळण लावी जीवना
शारदा स्पर्श हो हाता
करडी शिस्त लावता
नकळत बनतो पिता
छत्र दे आशीर्वादाचे
सांभाळी होवून भ्राता
कसोटी त्याचीच लागे
परिक्षा आमची घेता
त्याचाचं सबळ हात
निराशा पदरात येता
कुठलीचं नसे अपेक्षा
सखा भासे आवडता
देत राहतो सदोदीत
हात न घे आखडता
नागरिक बने सुजाण
आदर्श समस्त जगता
शिक्षकाची उपकृतता
माणूस म्हणून जगता
शिष्यतव मोठा होता
शिक्षका येई संपूर्णता
निस्पृह निर्मळ ममता
शब्दथिटे गुण वर्णता
देवा सारखा बरोबर
संकटात तोच त्राता
विविध रूपात दिसे
सगुण निर्गुण देवता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## परतूर-मंठा मतदारसंघ शिवसेनेला सोडण्यात यावा पदाधिकाऱ्यांची एक मुखी मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर मंठा नेर सेवली मतदारसंघ हा शिवसेनेला सोडण्यात येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांना उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी परतुर /मंठा नेर सेवली भागातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी शिवसेना नेते व विभागीय नेते अर्जुनराव खोतकर यांची जालना येथे भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराने हा मतदारसंघ सात ते आठ वेळेस निवडणूक लढविलेले आहे आणि सध्याची परिस्थिती पाहता भारतीय जनता पार्टी पेक्षा शिवसेनेला पोषक वातावरण आहे तसेच भाजपाला सात ते आठ वेळेस उमेदवारी दिली असता यावेळेस शिवसेनेला देणे यात गैर काय आहे? मोहन अग्रवाल हे उच्चशिक्षित असून त्यांना सर्व भाषेचे ज्ञान आहे सर्व सर्व जाती धर्माचे लोक त्यांच्या सोबत आहेत मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या माध्यमातून मतदार संघामध्ये त्यांनी शेकडो कोटी रुपयांचे विकास कामे केलेले आहेत तसेच शिवसेनेच्या संघटनमक बांधणी प्रत्येक गावात बूथ प्रमुख, शिवदूत,योजना दूत,शिवसेना सभासद नोंदणी,पदाधिकारी, कार्यकर्ते, शाखाप्रमुख,शिवसेना शाखा कार्यकारणी, आशा पद्धतीने शिवसेनेची मतदार संघामध्ये बांधणी करण्यात आलेले आहे, आणि लोकांचा शिवसेनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असून शिवसेनेमध्ये दररोज मतदार संघातील प्रवेश सोहळे सुरूच असतात, आणि भारतीय जनता पार्टी पेक्षा शिवसेनेला हा मतदारसंघ निवडून येणे अत्यंत सोपे आहे आगामी काळात महाराष्ट्र राज्यात शिवसेना-भाजप युतीची सत्ता आणयाची असल्यास हा मतदारसंघ शिवसेनेला सोडणे अत्यंत गरजेचे आहे म्हणून ह्या सर्व भावनांचा विचार करून मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांना आमच्या भावना कळवण्यात याव्यात अशी विनंती अर्जुनराव खोतकर यांना निवेदनाद्वारे केलेली आहे. लवकरच परतूर मंठा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना व भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांना मुंबई येथे भेटणार आहे त्यांच्याकडे या मतदारसंघाची वस्तूस्थिती पान २ वर

## विशेष पोलीस महानिरीक्षकांनी घेतला जिल्हा पोलीस दलाचा आढावा

**जालना । प्रतिनिधी -** नजिकच्या काळात महत्वाचे सण उत्सव ज्यामध्ये गणेश उत्सव, नवरात्र तसेच विधानसभा निवडणुक होणार असल्याने श्री. विरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी जालना जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची आढावा बैठकीचे आयोजन करण्याच्या सुचना दिल्या होत्या.



त्या अनुषंगाने बुधवार (दि ४) रोजी सकाळी अकरा वाजता पोलीस अधीक्षक कार्यालयातील मिटींग हॉलमध्ये बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकीस मा. श्री. विरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल व जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये आगामी गणेशोत्सव, ईद, निवडणुक व गुन्हे आढावा घेतला. सण-उत्सव शांततेत पार पाडावेत यासाठी मार्गदर्शक सुचना दिल्या. गणेशोत्सव मिरवणुक मार्ग पाहणी, मिरवणुक मार्गावरील अडथळे व त्याचे निराकरण, लावण्यात येणारे मनुष्यबळ, सिसिटीव्ही सर्व्हेलन्स, विसर्जन स्थळावरील सुविधा याबाबत सुचना पान २ वर

## बांधकाम कामगारांना तात्काळ प्रमाणपत्रे द्या - खा. डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना आवश्यक असलेले कामगार प्रमाणपत्र ग्रामपंचायतीना तात्काळ देण्याच्या सूचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्राद्वारे केल्या आहेत.

जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना शासनाने सुरक्षा किट व गृह उपयोगी साहित्य देण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी दाखल करायच्या प्रस्तावास ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मजुरांना जोडावे लागते. यापूर्वी हे प्रमाणपत्र ग्रामपंचायत देत असत,परंतू आता ग्रामपंचायत प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ करून बांधकाम मजुरांना त्रास देण्याचे काम करत आहे. मी आदेश दिले आहेत म्हणून सांगण्यात येत आहे. अशा प्रकारे आपल्या नावाचा वापर करून विशेषतः भोकरदन व जाफराबाद तालुक्यात प्रचार सुरू केला आहे, ही बाब गंभीर असून यामुळे बांधकाम कामगारांत असंतोष निर्माण झाला आहे. तरी या प्रकरणाची चौकशी करून अहवाल तयार करून सादर करावा आणि ९० दिवस काम केलेल्या कामगारांना तात्काळ प्रमाणपत्र पूर्वी प्रमाणे देण्यात यावे , जेणे करुन योजनेचा लाभ लाभार्थ्यांना होईल, असे ही जि प मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## श्री संत जनार्धन महाराज संस्थान येथे नवीन सभागृहाकरिता एक कोटी रुपये निधी उपलब्ध करून देणार - आ. लोणीकर



**मंठा । प्रतिनिधी -**

**धन्य आज दिन । झाले संतांचे दर्शन ।।१।। झाली पापातापा तुटी । दैन्य गेले उठाउठी ।।धृ।।**
**झाले समाधान । पायी विसावले मन ।।२।। तुका म्हणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ।।३।।**

संतांचे आज दर्शन झालं मी धन्य झालो. म्हणत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी श्री संत जनार्धन महाराज संस्थानासाठी नवीन सभागृहकरीता एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देऊ असे आश्वासन या वेळी आ. लोणीकर यांनी दिले. ते ते श्री संत जनार्धन महाराज संस्थान पेवा (नळडोह) तालुका मंठा जिल्हा जालना येथे श्रावण मासातील भव्य कीर्तन सोहळा समाप्ती निमित्त आयोजित ह. भ. प. अर्जुन महाराज लाड गुरुजी (केज धारूरकर) यांच्या काल्याच्या कीर्तन सोहळ्या काल्याचे किर्तन संपल्यावर उपस्थित भाविक भक्तांना उद्देशुन ते बोलत होते.

पुढे बोलतांना आ. लोणीकर म्हणाले की, आज संतांचे दर्शन झाल्याने पाप, ताप नष्ट झाले, दैन्य पहाता पहाता दूर झालं. मनाला समाधान झालं, संतांच्या चरणावर माझं मन विसावलं. तुकाराम महाराज म्हणतात, संत माझ्या घरी आले हाच माझा दिवाळी दसरा आहे. याच प्रमाणे आज येथे ह. भ. प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे काल्याचे कीर्तन श्रवन केल्याने मन अगदी प्रसन्न झालं आहे. संतांनी आपल्या आचार-विचारांतून, तत्वज्ञानांतून, अभंग-संकीर्तनातून महाराष्ट्राच्या या शुष्क माळरानावर भक्तीचे नंदनवन फुलविले. जातिभेदाच्या तटभिंती उध्वस्त केल्या. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी लागणाऱ्या भागवत धर्माची पुनर्स्थापना केली आणि याच धर्मानि जीवन जगण्याचे संदर्भ शिकवले..! महाराष्ट्र हे भाग्यवंत भाविक भक्तांचे राज्य आहे. असल्याचेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

या वेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्या सोबत गणेशराव खवणे, सतीश निर्वळ, पंजाब बोराडे, भाऊसाहेब गोरे, विठ्ठल काळे, मोहन आडे, राजेश मोरे, गजानन देशमुख, विलास घोडके, मनोज देशमुख, दीपक बोराडे, शरद मोरे, भगवानराव देशमुख, महेश पवार, नरेंद्र ताठे, अनंत जाधव, अशोक सोनटक्के, भगवान वरंकर, गणपतराव थोरात, शिवशंकर डोईफोडे, प्रकाश गव्हाळे, प्रकाश गडदे, श्रीराम जाधव, सचिन राठोड, जानकीराम महादेव बाहेकर, जुनेद पठाण, तोफिक कुरेशी, चव्हाण नवनाथ खंदारे, नवनाथ चट्टे, राजेश मस्के, प्रसाद गडदे, बाळू काळे, नंदू टकले, गजानन ऊरदुख, जगदीश जाधव, कपिल तिवारी, वैभव नरवडे यांची उपस्थिती पान २ वर

# संपादकीय

## शिक्षकांशिवाय जीवनाला दिशा नाही...

आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील. आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ म ार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वो च्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वो च्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# दिव्यांच्या झगमगाटावर भाळू नका!

मदर तेरेसा यांचे देहावसान दि.५ सप्टेंबर १९९७ साली झाला. त्यांच्या मृत्यूनंतर संतपद देण्यासाठी २००३ साली पहिला चमत्कार झाल्याचा दावा करण्यात आला. मोनिका बसेरा नावाच्या पश्चिम बंगाल येथील तरुणीच्या पोटातील कर्करोगाची गाठ मदर तेरेसांच्या फोटोमधून दिव्य शक्ती मिळाल्यामुळे बरी झाल्याचा हा दावा होता. आता विज्ञानाच्या कसोटीवर विचार करायचे ठरवले, तर एखादी व्यक्ती मृत्यूनंतर देखील इतर लोकांच्या जीवनावर प्रभाव टाकू शकते, हीच गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाही. थोडे पुढे जाऊन या दाव्यातील वास्तव समजून घेतले, तर अनेक गोष्टी लक्षात येतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर महत्त्वपूर्ण लेख वाचा...

मदर तेरेसा धाडसी होत्या. बैरूतला वेढा पडलेला असताना त्यांनी इ.स.१९८२मध्ये पॅलेस्टेनियन बंडखोर व इस्रायली सैनिक यांच्यात तात्पुरता समझोता घडवून आणून रेडक्रॉसच्या मदतीने ३७ लहान म ुलांची सुटका घडवून आणली. त्या स्वतः युद्धभूमीवर हिंडल्या. पूर्व युरोप ज्यावेळी अधिक मोकळा व्हायला लागला होता, त्यावेळी त्यांनी कम्युनिस्ट देशांमध्ये मिशनरीज ऑफ चॅरिटीचा प्रसार केला. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्या आजीवन झटत होत्या, त्या खरोखरच शांतिदूत होत्या. इथिओपियामधल्या भुकेलेल्यांना त्यांनी आधार दिला. त्या तिथे गेल्या. ज्या काळात चेर्नोबिलच्या किरणोत्सर्गाची घटना घडली, तेव्हाही आपल्याला त्याचा त्रास होईल किंवा नाही याची चिंता करत बसण्यापेक्षा त्या तिथे गेल्या. ज्यांना तो त्रास झाला त्यांना आधार दिला. मदर तेरेसा यांनी संतपदाची कसोटी असलेली दुसऱ्या चमत्काराची अट पूर्ण केली. त्यांना संतपद देण्याचा सोहळा डिसेंबर २०१५मध्ये झाला. ही उपाधी दि.९ सप्टेंबर २०१६ला लालवेटिकन सिटीमध्ये पोप फ्रांसिसने मदर तेरेसा यांना बहाल केली.

मदर तेरेसा यांचे जन्मनाव ऑग्नीसा गॉंकशा वाजक्शियू असे होते. त्यांचा जन्म दि.२६ ऑगस्ट १९१० रोजी अल्बानिया येथे झाला. या भारतरत्न आणि नोबेल शांतता पुरस्कार सन्मानित एक भारतीय रोमन कॅथॉलिक नन होत्या. नवीन चावला हे मदर तेरेसा यांचे अधिकृत चरित्रकार होते. त्या भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी अनेकांना तसा बाप्तिस्मा दिला; अशा असंख्य वार्ता त्या काळात उठत राहिल्या, पण त्या सगळ्या तथ्यहीन होत्या. त्या एकदा अशाच टीकेला त्रासून म्हणाल्या, की होय, आपण त्यांचे धर्मांतर घडवते. हिंदूंना अधिक चांगले हिंदू बना, म ुस्लिमांना अधिक चांगले मुस्लिम व्हा, तर ख्रिश्चनांकडे अधिक चांगले ख्रिश्चन बना असा आग्रह धरते. इ.स.१९७९म ध्ये त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला तेव्हा आणि इ.स.१९८०मध्ये त्यांना भारतरत्न किताब देण्यात आला, तेव्हाही त्या म्हणाल्या, की त्यांना दिव्यांच्या लखलखाटात जायला अजिबात आवडत नाही.

दि.५ सप्टेंबर १९९७ साली झाला. त्यांच्या मृत्यूनंतर संतपद देण्यासाठी २००३ साली पहिला चमत्कार झाल्याचा दावा करण्यात आला. मोनिका बसेरा नावाच्या पश्चिम बंगाल येथील तरुणीच्या पोटातील कर्करोगाची गाठ मदर तेरेसांच्या फोटोमधून दिव्य शक्ती मिळाल्याम ुळे बरी झाल्याचा हा दावा होता. आता विज्ञानाच्या कसोटीवर विचार करायचे ठरवले, तर एखादी व्यक्ती मृत्यूनंतर देखील इतर लोकांच्या जीवनावर प्रभाव टाकू शकते, हीच गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाही. थोडे पुढे जाऊन या दाव्यातील वास्तव समजून घेतले, तर अनेक गोष्टी लक्षात येतात. प्रत्यक्षात कुठलेही साक्षी पुरावे न देता हा दावा करण्यात आला होता. चौकशीमध्ये पुढे हे देखील समोर आले होते, की प्रत्यक्षात त्यांना क्षयरोगाचा उपचार चालू होता. त्यांच्या पोटातील गाठ देखील क्षयरोगातून झालेली होती आणि क्षयरोगाच्या उपचारांनी ती गाठ बरी झाली होती. त्यावेळी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महा.अंनिसने या चमत्काराच्या दाव्याला विरोध केला होता. वास्तव समाजापुढे ठेवले होते. त्यानंतरही त्याच पद्धतीने २००८म ध्ये केवळ मदर तेरेसा यांचे नाव घेऊन प्रार्थना केल्यामुळे ब्राझीलम धील एका व्यक्तीच्या मेंदूतील गाठी बऱ्या झाल्याचा चमत्कार घडल्याचा दावा केला जात आहे. ही व्यक्ती कोण आहे? त्याला नक्की कोणता आजार होता? प्रार्थनेमुळेच हा आजार बरा झाला, हे कशावरून सिद्ध होते? यांपैकी कोणत्याही प्रश्नांचे समाधानकारक उत्तर न देता केवळ चमत्कार झाला, असे सांगणे हे विज्ञानाच्या प्राथमिक कसोट्यांवर देखील उतरत नाही. आता मात्र या चिकित्सेवर पडदा पडला की काय? याबद्दल काहीही कळत नाही. त्यांना दि.१७ डिसेंबर २०१५ पोप फ्रान्सिस यांनी संत घोषित केले. पंधरा भारतीय अधिकरी व हजार एक अन्य लोक दि.५ सप्टेंबर २०१६ रोजी सेंट पीटर स्वेअरमध्ये संतपणाच्या मिसबलिदानात सामील झाले होते. सन २०१२मध्ये झालेल्या आऊटलुक इंडियाच्या द ग्रेटेस्ट इंडियन या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणामध्ये मदर तेरेसा पाचव्या क्रमांकावर होत्या. शांतिदूत मदर तेरेसा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे,**
**गडचिरोली, मो. ७७७५०४१०८६.**

# परभणीच्या शिवाजी विधी महाविद्यालयाचा कृणाल बेंद्रे विजेता

## १०० शिक्षकक्लब च्या शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जालना येथील १०० शिक्षक क्लब तर्फे म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी जालना जि.प.च्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात करण्यात आले होते.

स्पर्धेचा अंतिम निकाल एका निवेदनाद्वारे घोषित करण्यात आला आहे तो पुढील प्रमाणे प्रथम क्रमांक, रोख ५००० रू.

सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र कृणाल रामेश्वर बेंद्रे (शिवाजी विधी म हाविद्यालय, परभणी) द्वितीय क्रमांक रोख ४००० रू, अदिती अरविंद सुरंगळीकर (बद्रीनारायण बारवाले म हाविद्यालय, जालना) तृतीय क्रमांक रोख ३००० रू. सिद्धी शांतीलाल राऊत (माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) चतुर्थ क्रमांक- रोख २००० रू. गायत्री गणेश अंभुरे (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे) पाचवा क्रमांक रोख १००० - रू. आकाश दत्तात्रय मोहिते (न्यू आर्ट्स महाविद्यालय, अहमदनगर व उत्तेजनार्थ शिवकन्या नवनाथ शिंदे (खोलेश्वर महाविद्यालय, आंबेजोगाई) पल्लवी रामकिसन धनगर (बद्रीनारायण बारवाले म हाविद्यालय, जालना) शुभम एकनाथ शिंदे (अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना) सुषमा आबासाहेब वाघ (प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण) दुपारच्या सत्रात स्पर्धक विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी अन्नदान स्वरूपात उपक्रमशील शिक्षिका श्रीमती अनुजा राऊत यांनी सहकार्य व मदत केली. यावेळी राज्य पुरस्कार प्राप्त

**९५ स्पर्धकांची नोंदणी**

स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक आर. आर. जोशी तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख, प्राचार्य धम्मरत्न वायवळ, विस्तार अधिकारी सुभाष भालेराव, अभियंता एस.एन. कुलकर्णी, जमीर शेख, राजेभाऊ मगर व डॉ. शिवनंदा मेहेत्रे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी एकुण ९५ स्पर्धकांनी नोंदणी केली होती. वक्तृत्व स्पर्धेसाठी स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परीक्षणासाठी परीक्षक म्हणून प्रा. जालींदर बटुळे, डॉ. रामदास निहाळ, ॲड, सौरभ औटे, डॉ. मंगल मुळे व सीमा सरपोतदार यांची निवड करण्यात आली होती. अशी माहिती संयोजन समि ती अध्यक्ष राजेभाऊ मगर व संदीप इंगोले यांनी दिली.

आदर्श शिक्षक जमीर शेख यांच्या सेवानिवृत्तीबद्दल म ान्यवरांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. स्पर्धेच्या आयोजनासाठी राजेभाऊ मगर, दत्तात्रय राऊतवाड, संतोष लिंगायत, संदीप इंगोले, तुकाराम काकडे, माया कवानकर, मनीषा पाटील, कविता दाभाडे,

ज्योती जोशी, शुभांगी लिंगायत, अश्विनी खंडागळे, प्रभा जाधव, विष्णू बिरादार, प्रदीप घाटेशाही, चंद्रकांत धोत्रे, रामेश्वर धोपटे, सचिन सुरडकर व अमोल कंडारे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अप्पासाहेब मुळे यांनी तर आभार संदीप इंगोले यांनी मानले.



पान १ वरुन

## परतूर मंठा मतदारसंघ ...

मांडणार आहेत अशी ही माहिती मिळालेली आहे. यावेळी शिवसेनेचे जालना जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना दलित आघाडी जिल्हाध्यक्ष भास्करराव मगरे परतुर मंठा मतदार संघ

शिस्टमंडळामध्ये मंठा मार्केट कमिटीचे माजी सभापती

प्रल्हादराव बोराडे शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले परतुर शिवसेना तालुकाप्रमुख अमोल सुरूग मंठा तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे शिवाजी तरवटे जिल्हाध्यक्ष ओबीसी सेल, विजयकुम ार गिरी विधानसभा संघटक, सो ललिता ताई काळदाते महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख, योगेश गंगे उपजिल्हाप्रमुख युवासेना, दीपक हिवाळे शहर प्रमुख परतुर, शेख खाजा अल्पसंख्यांक आघाडी परतुर, राहुल भदर्गे दलित आघाडी तालुकाप्रमुख, नीताताई घोंग महिला आघाडी तालुकाप्रमुख, अविनाश कापसे युवा सेना तालुकाप्रमुख, रंजीत कोल्हे तालुकाप्रमुख परतुर, रामप्रसाद कसा ज्येष्ठ नेते, सोपान का तारे तालुकाप्रमुख, नितीन राठोड तालुकाप्रमुख, अंगत खरात विभाग प्रमुख, मधुकर निलेवाड कैलास ढवळे विभाग प्रमुख, सोनाली देशम ुख महिला आघाडी तालुकाप्रमुख, संगीता ताई मगर महिला आघाडी तालुकाप्रमुख परतुर, सोनाली राऊत महिला आघाडी शहर प्रमुख परतुर, रामराव वरकड तालुकाप्रमुख मंठा, विलास राठोड उप तालुकाप्रम ुख, दीपक गायकवाड युवा सेना तालुकाप्रमुख मंठा, पांडुरंग बोराडे अमोल वीरकर शिवसेना शहर प्रम ुख कैलाश पुरी उपशहर प्रमुख मधुकर निलेवाड, राजाराम भांडवलकर, दत्ता आढाव ग्रामपंचायत सदस्य, उपशहर प्रमुख विनोद खरात सर्कल प्रमुख पाटोदा सुनील गुंड सर्कल प्रमुख तळणी नंदू मामा जाधव सर्कल प्रमुख, अभिषेक रोकडे उपविभाग प्रम ुख, चांद भाई अल्पसंख्यांक आघाडी तालुका प्रमुख म्हणतात, कैलास चव्हाण वैद्यकीय कक्ष प्रमुख, सरपंच लक्ष्मण कदम, देविदास शेजुळ संजीव राठोड राम सुरेश दगडू चव्हाण रामा मानू राठोड राजेभाऊ चव्हाण महादेव चव्हाण दगडोबा चव्हाण, विलास भानुदास राठोड, राठोड,, शिवाजी राठोड, औदुंबर गोरे ग्रामपंचायत सदस्य वरफळ, संदिपान रुपनर, साहेबा जरा, बाळासाहेब गोरे, प्रणय मोर शहर प्रमुख, अतुल आर्दड, अशोक टेकाळे, अलीम भाई अल्पसंख्यांक शहर प्रमुख मंठा नागेश चिखले विभाग प्रमुख वाटुर अंगात खरात विभाग प्रमुख वाटुर म ाऊली वायाळ सर्कल प्रमुख खराडसावंगी, रंजीत कोल्हे, नजीर भाई, शरद तळेकर प्रल्हाद शेळके कविताताई ताठे श्री कदम शाम तळेकर आदिनाथ घुगे व आदी कार्यकर्ते उपस्थित होते

## विशेष पोलीस महानिरीक्षक ...

दिल्या तसचे जिल्ह्या पोलीस दलाची नियमित गुन्हे परिषद घेतली. तसेच मागील सण-उत्सव, निवडणुका दरम्यान दाखल असणारे गुन्हे व गुन्ह्यातील आरोपीतांची माहिती घेऊन त्यांचेवर करण्यात आलेल्या प्रतिबंधक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. आरोपीतांची गुन्हे निहाय वेगवेगळी यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक साहेब यांचे हस्ते जिल्ह्यातील नवनियुक्त १०६ पोलीस अंमलदार यांना नियुक्तीपत्र देऊन पोलीस सेवेत सामाविष्ठ करुन घेण्यात आले तसेच सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन मागील एका महिन्यात जिल्ह्यातील गहाळ झालेले / चोरीस गेलेले एकुण १५६ विविध कंपनीचे हस्तगत केलेले मोबाईल मुळ मालकास परत करण्यात आले आहेत.

## श्री संत जनार्धन महाराज ...

होती. श्री संत जनार्धन महाराज संस्थान पेवा (नळडोह) तालुका मंठा जिल्हा जालना येथे सभागृह बांधकामासाठी यापूर्वी आपण ३० लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला असून. पुढील मोठ्या सभागृहाकरिता आपण भावी काळात एक कोटी रुपये निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासनबरोबरच सर्व हिंदू धर्मियांना व हिंदू भाविक भक्तांना गर्व वाटावा असे भव्य दिव्य जगातले सर्वात सुंदर प्रभू श्रीरामाचे मंदिर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आयोध्येत साकार झाल्याचे आ. लोणीकर यांनी सांगितले.

### गुरुने दिला ज्ञानरूपी वसा आम्ही चालवू हा पुढे वारसा

# ज्ञानाचा प्रकाश देण्या दिवा अखंड तो जळतो जीवनाचा अर्थ खरा शिक्षकांमुळेच कळतो

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षकाचे स्थान अतिशय मोलाचे आहे . आपल्या आयुष्यातील अडचणी सोडविण्यात आणि यशाचा मार्ग दाखविण्यात त्यांचा मोलाचा वाटा असतो म्हणूनच दरवर्षी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो ५ सप्टेंबर हा दिवस आपले भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस त्यांनी तब्बल ४० वर्षे शिक्षण क्षेत्राला दिलेल्या योगदानाबद्दल हा दिवस साजरा केला जातो ५ सप्टेंबर १९६२ पासून संपूर्ण भारतभर हा दिवस शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मोठ्या उत्साहाने साजरा करतात डॉक्टर राधाकृष्णन एक महान देशभक्त विद्वान आणि विद्यार्थी प्रिय शिक्षक होते.

ज्योत पेटण्यासाठी समईत हवी वात,
चांदणं पाहण्यासाठी आकाशात हवी रात आणि ध्येय गाठण्यासाठी पाहिजे असते शिक्षकांची साथ.

शिक्षक हे भावी पिढीला घडविणारे शिल्पकारच आहेत. शिक्षक हे ज्ञानाच्या प्रकाशाने जीवनातला अंधार नाहीसा करतात. आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याचे बळ देतात. जीवन कसे जगावे हे शिकवतात. आपल्यातील अपूर्णत्वाला पूर्ण करतात. खरंतर शिक्षकांच्या हातात देशाचे भवितव्य असते भविष्यातील डॉक्टर, वकील ,इंजिनियर, शास्त्रज्ञ ,अधिकारी व आदर्श नागरिक घडविण्याचे काम शिक्षकच करत असतात म्हणून तर देशाच्या जडणघडणीत व प्रगतीत शिक्षकांच्या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व आहे म्हणूनच असे म्हणतात ज्या देशातील शिक्षक कर्तुत्ववान असतात तो देश कधीच मागे राहत नाही. सुयोग्य अशा मार्गदर्शनामुळे शिक्षक विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल करतात म्हणूनच शिक्षकांचे स्थान पालकांपेक्षाही महत्त्वाचे आहे.

थोडक्यात म्हणायचे तर शिक्षक म्हणजे - शि- शिस्तप्रिय. क्ष- क्षमाशील, क- कर्तुत्ववान, कलाप्रेमी. या तीन अक्षरांमध्ये शिक्षकाचे साम र्थ्य सामावलेले आहे.

शिक्षक हा आपल्या समाजाचा कणा आहे शाळेतील विद्यार्थ्यांसोबत समाजाची जडणघडण व विकासातही अनमोल योगदान देतात .आई वडील आपल्याला जन्म देतात तर शिक्षक हे आपल्या जीवनाला आकार देतात. पाया भक्कम असेल तर त्यावरच भक्कम इमारत उभी राहते. आपले शिक्षक हे ज्ञानदानातून आपल्या जीवनाचा पाया भक्कम करीत असतात ज्यावर आपल्या भविष्यात कर्तुत्वाची भक्कम इमारत उभी राहत असते .महात्मा गांधी ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर कुठल्याही महान व्यक्तींच्या आत्मचरित्रामध्ये आपण त्यांच्या शिक्षकांचा उल्लेख नक्कीच वाचायला मिळतो.

आजच्या काळात तर नव समाज निर्मिती व समाज परिवर्तन अशी दुहेरी जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडली आहे. शिक्षक म्हणजे असत्याकडून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ आहे जो जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत विद्यार्थ्यांच्या हितासाठी कल्याणासाठी धडपडत असतो .

खरंतर आज शिक्षकांच्या डोक्यावर अतिरिक्त कामांचा ताणही खूप वाढलेला आहे तरी पण शिक्षक देशाची आदर्श पिढी घडविण्याचे काम मनोभावे करत आहेत. शिक्षकांच्या या अमूल्य कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे .हा दिवस आपण सर्व शाळा ,महाविद्यालय यांमध्ये शिक्षकांना फ ुल, भेटवस्तू किंवा शुभेच्छा कार्ड देऊन त्यांचा आशीर्वाद घेऊन साजरा करत असतो.

शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवही केला जातो. खरंतर या दिवशीच नव्हे तर नेहमीच शिक्षक या आदराला पात्र असतात. परंतु आज शिक्षणाचे व शिक्षकांचे अवमूल्यन हो असल्याचे चित्र समाजात दिसत आहे गुरु शिष्य संबंधातील पवित्र भावना लोप पावत चालली आहे. यासंबंधातील पावित्र्य कायम ठेवण्यासाठी व डॉक्टर राधाकृष्णन यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो आपल्या व्यक्तिमत्वावर त्यांच्याकडून संस्कार, संस्कृती, परंपरा, चालीरीती व आदर असे पैलू पाडले जात असतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंचा नेहमी आदरपूर्वक सन्मान केला पाहिजे तरच त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

शेवटी मी इतकेच म्हणेन की ,
ज्ञान देने वाले गुरु का वंदन है ।
उनके चरणों की धूल भी चंदन है।
सबके सामने कर सकू बात.
यह विश्वास मुजमें जगायाँ,
गुरु तेरे उपकार का कैसें चुकाऊँ मोल.
लाख किंमती धन भला,
गुरु हे मेरें अनमोल. गुरु हे मेरें अनमोल.



विद्यार्थ्यांच्या जीवनाचे परिसरुपी स्पर्शाने सोनं करणाऱ्या अशा या सर्व शिक्षक बंधु भगिनींना , सर्व मार्गदर्शक गुरूंना आजच्या या सुमंगलदिनी कोटी कोटी प्रणाम, वंदन करते .नतमस्तक होते. जय हिंद !जय महाराष्ट्र!

**सौ संतोषी संपत बांगर,**
**मूळ शाळा- गायत्री विद्यामंदिर भांडुप (पश्चिम)**
**बदली शाळा - सह्याद्री विद्यामंदिर भांडुप (पश्चिम)**

# महिला सक्षमीकरणाचा महाराष्ट्र नवा आदर्श - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## सक्षमीकरण योजनांमुळे महिलांच्या स्वावलंबन व निर्णयशक्तीत वाढ





**उदगीर । लातूर । प्रतिनिधी** - राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्यासह अनेक महनीय महिलांनी महाराष्ट्रात सामाजिक प्रगतीचा पाया घातला आहे. त्याच राज्यात शासनाने आता महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावले उचलून त्यांच्या स्वावलंबन, निर्णय शक्तीत वाढ केली आहे. महाराष्ट्राने महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दांमध्ये देशाच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सुरु असलेल्या आर्थिक विकासाच्या निर्णयाचे कौतुक केले आहे.

उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि शासन आपल्या दारी योजना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्राच्या दैदिप्यमान इतिहासाचे कौतुक करत महिला सक्षमीकरणाला राज्य शासन चालना देत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. तर विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्राम विकास आणि पंचायतराज, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे आणि महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांचीही उपस्थिती होती.

यावेळी त्यांनी उदगीर येथील विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण आणि हजारोंच्या संख्येने उपस्थित महिलांशी संवाद साधायला मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, मी महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांसह महिलांच्या अन्य योजनांची माहिती घेतली. याशिवाय राज्यात लखपती दिदी योजनेला मिळत असलेल्या प्रतिसादाचाही आढावा घेतला. या योजनांचे दृष्य परिणाम दिसत असल्याचा आनंद त्यांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्रात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, बहिणाबाई चौधरी ते सिंधुताई सपकाळांपर्यंत अनेक आदर्श महिलांपुढे आहेत. महिलांची लोकसंख्या देशाच्या अर्ध्या लोकसंख्येइतकी आहे. प्रत्येक कुटुंबात उदरनिर्वाह चालविण्यासाठी महिलांची मुख्य भूमिका असते. त्यामुळे महिलांनी आता राजकीय क्षेत्रातही पुढे येत देशाचे नेतृत्व करावे, असे आवाहनही त्यांनी याठिकाणी जमलेल्या महिला व युवतींना केले.

पुरुषांची उपस्थिती लक्षात घेऊन त्या म्हणाल्या, पुरुषांनी आता महिलांच्या क्षमतेला ओळखून त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी पाठबळ द्यावे. तसेच आमच्या संस्कृतीत महिलांचा सन्मान करणे पुरुषार्थ मानला जातो. प्रत्येक कुटुंबामध्ये हा सन्मान दिसून आला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. महिलांनी सर्व आघाड्यांवर अग्रेसर राहताना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची सूचनाही त्यांनी वडीलकीच्या भूमिकेतून केली.

**लाडकी बहीण योजना सुरुच राहील - मुख्यमंत्री**

राष्ट्रपती महोदयांचे प्राचीन आणि ऐतिहासिक शहर असलेल्या उदगीर शहरात आल्याबद्दल स्वागत करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य शासनामार्फत सुरु असलेल्या महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच राष्ट्रपतींच्या जीवनातील संघर्ष हा सर्वसामान्य महिलांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी केलेल्या संघर्षामुळेच आज त्या देशाच्या सर्वोच्च पदी विराजमान झाल्या आहेत. या ठिकाणी उपस्थित महिलांना राष्ट्रपती महोदयांच्या यशाचे कौतुक असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम राहणार असल्याचे स्पष्ट करत राज्य शासनाने केंद्र शासनाच्या लखपती दिदी योजनेसह मुख्यमंत्री लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कार्यक्रम योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत योजना, अन्नपुर्णा योजना, शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी योजना यासह महिलांच्या सशक्तीकरणावर भर असलेल्या योजनांमुळे शासन सकारात्मक दिशेने वाटचाल करत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही ती पुढेही चालूच राहणार आहे. माझी एकही बहीण या योजनेपासून वंचित राहणार नाही आणि माता भगिनींचा आशीर्वाद कायम राहिल्यास दीड हजाराची रक्कम वाढविली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश आर्थिक महासत्ता बनण्याकडे अग्रेसर असून, अकराव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आम्ही झेप घेतली आहे. महाराष्ट्र देशाच्या प्रगतीत कायम आघाडीचे राज्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. संविधान बदलाच्या अफवेला त्यांनी फेटाळून लावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सामान्य कुटुंबातील एक संघर्षशील महिला आपल्यापुढे राष्ट्रपती म्हणून विराजमान आहेत. तर मागास वर्गीयाचे प्रतिनिधीत्व नरेंद्र मोदी हे देशाचे प्रधानमंत्री आहेत. त्यामुळे या अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

स्थानिक आमदार व मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर जिल्हा करण्याची तसेच उदगीर येथे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची मागणी आपल्या प्रास्ताविकात केली होती. त्याचा उल्लेख करताना त्यांनी सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील, असे सांगितले.

**संविधान बदलू शकणार नाही - रामदास आठवले**

राज्य, देशाच्या विकासासाठी आणि संविधान मजबूत करण्यासाठी सर्वजण प्रयत्नरत असून, देशाचे कोणीही संविधान बदलू शकत नसल्याचा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. तसेच राज्याची विकासाची गाडी पुढे नेताना महिलांना आर्थिक ताकद देत त्यांनाही विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

**घटनारक्षण प्रथम कर्तव्य - देवेंद्र फडणवीस**

उदगीर येथील विश्व शांती बौद्ध विहार निर्मिती व आज महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते लोकार्पण केल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री संजय बनसोडे यांचे अभिनंदन केले. जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारावर चालणारा जपानसह आशियातील अनेक देश विकसित झाले आहेत. जगातील सर्वात उत्तम संविधान हे भारताचे असून, ते कोणीही बदलू शकणार नाही, असे सांगून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्र व राज्य शासन संविधानानुसारच काम करत आहे. केंद्र शासनाच्या नेतृत्वात राज्य शासनाने केंद्र शासनाकडून चैत्यभूमीची जागा परत घेतली आहे. तसेच लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घर लिलावात विकत घेतले आहे. शिवाय जपानमधील कोयासन विद्यापिठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारला असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पानुसार २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवायचे आहे. या विकास प्रक्रियेत महिलांचाही तेवढाच महत्त्वपूर्ण सहभाग राहणार असल्यामुळे केंद्र व राज्य शासन पुरस्कृत महिला सक्षमीकरणाच्या विविध योजनांचा त्यांनी उल्लेख केला. त्यामध्ये मुलगी वाचवा, मुलगी शिकवा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांसह लखपती दिदींचा आवर्जून उल्लेख केला. या योजना बंद पडणार नाहीत, याची ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

**सक्षमीकरणात महाराष्ट्र प्रथम - श्रीमती तटकरे**

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात १ कोटी ६० लाखांपेक्षा जास्त महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून दिल्याचे सांगत लवकरच अडीच कोटींवर महिलांना लाभ मिळेल, असे महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांनी सांगितले.

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या या योजनेतून राज्यातील महिलांच्या विकासात मोठा बदल घडून येणार असून, महिलांच्या विकासात कोणतीही कसर राहणार नाही. महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. राज्यात बालकांच्या नावापुढे आईचे नाव लावणारे हे देशातील पहिले राज्य असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याच्या सक्षम नेतृत्वात महिला व बालविकास विभागांतर्गंत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अधिक प्रभावी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**जिल्हा व मेडिकल द्या - संजय बनसोडे**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर येथील विश्वशांती बुद्धविहाराचे महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले असून, बुद्धाच्या शांततेच्या विचार मार्गावरूनच जगाला पुढे जावे लागणार आहे. उदगीरातील धार्मिक, ऐतिहासिक स्थळातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला जातो, असे सांगताना त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून पुरोगामी महाराष्ट्रात नवा प्रकाशमार्ग निर्माण केला आहे. यावेळी त्यांनी उदगीर शहराच्या विकासकामांची उपस्थितांना माहिती देत त्यांच्या नेतृत्वात राज्य, जिल्ह्याचा विकास होतो आहे. त्यामुळे उदगीरमध्ये जिल्ह्याची क्षमता असून, उदगीरची जिल्हा निर्मिती करावी तसेच येथे वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी देण्याची मागणी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी मागणी केली.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज उदगीर येथे 'शासन आपल्या दारी' या पुस्तकाचे विमोचन झाले आणि त्याची पहिली प्रत राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना भेट देण्यात आली. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू आणि राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज महिलांना लाभवाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला वेगवेगळ्या पेहरावात जिल्ह्यातील महिला आल्या होत्या. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आणि डोळे दीपवणाऱ्या आयोजनामुळे हा कार्यक्रम स्मरणीय ठरला. जिल्हा प्रशासन गेले अनेक दिवस या कार्यक्रमासाठी मंत्री संजय बनसोडे व जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांच्या नेतृत्वात झटत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ज्योती अंबेकर यांनी केले.

---



**शहरातील कन्हैयानगर येथील कन्हैयानगरचा राजा गणेश मंडळाच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त मंडपाचे भुमिपुजन माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लक्ष्मण क्षीरसागर, पंडीत भुतेकर, मेघराज चौधरी, विजय हजारी, दीपक राठोड यांच्यासह सुनील डोईफोडे, कुलभूषण जैन, उमेश क्षीरसागर, सागर दळवी, आश्विन भंवर, गणेश लोखंडे, बबलू क्षीरसागर, प्रकाश वाढेकर, सागर व्यवहारे, यश हजारी, वृषभ बोरा, अभी अंबेकर सचिन सुरुळे आदी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

---

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ शिवनंदा मेहेत्रे यांचा मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने सत्कार



जालना । प्रतिनिधी - येथील जिल्हा परिषद प्रशाला मुलांची मल्टीपर्पज हायस्कूल जालना या ठिकाणी मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असलेल्या इंग्रजी विषयाच्या शिक्षिका डॉ शिवनंदा मेहेत्रे यांना सन २०२३-२४ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने त्यांच्या राहत्या घरी त्यांचे पती श्री हरकळ साहेब सेवानिवृत्ती आरोग्य कर्मचारी यांच्यासमवेत शाल, पुष्पगुच्छ व प्रसिद्ध ग्रामीण कवी श्रीकांत गायकवाड यांचा रानफुले हा काव्यसंग्रह देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातून राज्यातील ११० शिक्षकांपैकी जालना जिल्ह्यातील दोन शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे .त्यापैकी डॉ शिवनंदा मेहेत्रे या एक शिक्षिका होत. त्यांनी शंभर शिक्षक क्लब ,अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला यांच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक , साहित्यीक व सामाजिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केलेली आहे. त्या उत्तम प्रकारच्या लेखिका सुद्धा आहेत.याच बाबींची विशेष उल्लेखनीय कामगिरी पाहूनच शासनाने त्यांना आदर्श माध्यमिक शिक्षिका म्हणून पुरस्कार जाहीर केलेला आहे.येत्या ५ सप्टेंबर म्हणजे शिक्षक दिनी शासनाच्या वतीने मुंबई या ठिकाणी त्यांचा विशेष गौरव केला जाणार आहे. त्यांचा सत्कार करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटटे, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवते,मार्गदर्शक तथा बामुक्टो संघटनेचे सरचिटणीस तथा जूण्या पेन्शन संघटना राज्याध्याक्ष , प्रसिद्धअर्थतज्ञ डॉ मारूती तेगमपुरे,केंद्रीय कार्यकारणी सदस्य आरेफ कुरेशी,कोषाध्यक्ष नारायण मुंडे, कार्याध्यक्ष एफ ए सय्यद,उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव प्रद्युम्न काकड,महिला आघाडीच्या शहराध्यक्ष ज्योती पांगारकर, श्रीमती मगर प्रबोधनकार ठाकरे महाविद्यालय शहागड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---



**महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची छाया फाऊंडेशनचे डॉ. गोविंद भताने, ॲड. महेश भताने यांनी मुंबई राजभवन येथे भेट घेतली. प्रसंगी महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल- रुख्मिणींची मुर्ती राष्ट्रपतींना भेट देण्यात आली. छाया फाऊंडेशनच्या कार्याबाबत राष्ट्रपतींना माहिती देऊन भविष्यात करण्यात येणाऱ्या सिकललेस रुग्ण, वकिल - डॉक्टरांचे प्रश्न सरंक्षण, तसेच इतर मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी दंततज्ज्ञ डॉ. गोविंद भताने, विधीज्ञ ॲड. महेश भताने व मेडिकल कॉन्सीलचे महाराष्ट्र प्रशासक डॉ. विन्की रुघवानी यांची उपस्थिती होती.**

---

# एसबीआय बॅंकेमध्ये केवायसीसाठी आता दोन काऊंटर

## अर्जुन पाडेवार यांच्या निवेदनाची दखल

**परतूर । प्रतिनिधी** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म दाखल करण्यासाठी माता-भगिनींची होणारी गर्दी पाहता बॅंकेत दोन स्वतंत्र काऊंटर सुरु करण्यात यावेत तसेच खात्याला होल्ड लावण्यात येऊ नये अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी केली होती.दरम्यान, पाडेवार यांच्या दोन्हीही मागण्या मान्य करण्यात आल्या असल्याने बॅंकेतील गर्दी आता कमी झाली असून आता विनाविलंब कामे होत आहेत.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यासाठी शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या शाखेसमोर भल्या पहाटेपासूनच माता-भगिनींची मोठी गर्दी होत होती. त्यातच दररोज केवळ ५० केवायसी होत होत्या.त्यामुळे माता-भगिनींना अतोनात त्रासाला सामोरे जावे लागत होते. शिवाय बॅंकेसमोरील गर्दीमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता.ही बाब लक्षात घेत सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केवायसीसाठी केवळ ५० टोकनची अट रद्द करून एक ऐवजी दोन स्वतंत्र कक्षाची स्थापना करावी तसेच खात्याला लावण्यात येणारे होल्ड काढण्यात यावे अशी मागणी केली होती. पाडेवार यांच्या निवेदनाची दखल घेण्यात आली असून बॅंकेत केवायसीसाठी आता दोन कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच ५० टोकानची अट रद्द करण्यात आली आहे.

यामुळे आता महिलांना होणारा त्रास कमी झाला असून बॅंकेतील गर्दीही कमी होऊ लागली आहे.

खड्ड्यांचा व अस्वच्छतेचा करावा लागणार सामना

## बाप्पा जालना शहर महानगर पालिकेला सद्बुद्धी दे!

**जालना । प्रतिनिधी -** शहर परिसरातील अनेक भागातील रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवानिमित्ताने याच मार्गावरुन बाप्पांची मिरवणुक निघणार आहे. यामुळे श्री गणेश भक्तांमध्ये नाराजी पसरली आहे. सोशल मिडीयाच्या माध्यमातून अनेकांनी यावर जालना शहर महानगर पालिकेला दोषी ठरवत गणेशोत्सवापुर्वी शहरातील रस्त्यांवरी खड्डे बुजविण्याची मागणी केली आहे. अस्वच्छताही मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. श्री गणेश महासंघ तसेच गणेश फेस्टीवल यांच्यावतीने आवाज उठविण्याची आवश्यकता असल्याचे भक्त बोलतात. शहरात बाप्पांचे आगमन होत असून बाप्पांसह गणेश भक्तांना यंदा खड्ड्यांच्या व अस्वच्छतेचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे बाप्पा जालना शहर महानगर पालिकेला सद्बुद्धी देवो अशी प्रार्थना गणेश भक्तांकडुन केल्या जात आहे.



**अवघ्या दोन दिवसानंतर गणरायाचे आगमन होत आहे. या निमित्ताने शहरभरातील रस्त्यावर थाटात बाप्पांची मिरवणुक काढण्यात येईल. मात्र, बाप्पांना अनेक मार्गावरील खड्ड्यांच्या रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागणार आहे. जालना शहर महानगर पालिकेला याचे कोणतेही सोयरसुतक नसल्याने गणेश भक्तांमध्ये नाराजी आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)**

# कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मंजूर

## शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंदणी तातडीने करावी -जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** महसूल व वन विभाग शासन निर्णयान्वये ई-पीक पाहणी बाबतची माहिती भ्रमणध्वनीम धील ॲपद्वारे गाव नमुना १२ मध्ये नोंदविण्यासाठी कार्यपध्दती निश्चित केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ई-पीक पाहणी प्रकल्प क्षेत्रीय स्तरावर महसूल व कृषी विभागाने संयुक्तरित्या राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यात ई-पीक पाहणी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. जे शेतकरी ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर त्यांचा पीक पेरा नोंदणी करणार नाहीत त्यांना पीक कर्ज, पीक विमा, नुकसानभरपाईसह इतर शासकीय योजनाचा लाभ मिळणार नाही. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंदणी तातडीने करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या, अनुषंगाने सर्व तालुकास्तरावर प्रचार प्रसार, प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे ई-पीक पाहणीची नोंदणी करण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आलेले आहे. जालना जिल्ह्यात दि. १ ऑगस्ट २०२४ पासून खरीप हंगाम ई-पीक पाहणीची सुरवात झाली असून चालु हंगामासाठी सुधारित मोबाईल ई- पीक पाहणी ॲप (डीसीएस) व्हर्जन ३.०.०.० गुगल प्लेस्टोअरवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

वर्ष २०२३ च्या खरीप हंगामातील कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभागाच्या दि. २९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय देण्यासाठी सुचित केले आहे. या शासन निर्णयात राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप, पोर्टलव्दारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र राहतील. ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर नोंद असलेल्या क्षेत्रानुसार व त्याप्रमाणात परिगणना करून अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. याप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहेत. मोबाईल ॲप प्रणालीवर पीक पेरा नोंदणीबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर प्रचार, जनजागृती करण्यात आलेली आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.